# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन
२०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./ 1118 /२०२६ दि. २१/०८/२०२६

## परिपत्रक

विषय:- मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतची माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ:- मा. प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस-शिष्य/२०२६-२७/मराठी माहिती/संकिर्ण/E-३०६२२२२ दि. २०/०८/२०२६

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती तसेच सोयी-सुविधा सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांची माहिती सोबत संलग्नित तक्त्यात भरुन तात्काळ दोन दिवसांत संचालनालयास सादर करावयाची आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतची माहिती दि. २४/०८/२०२६ रोजी २.०० वाजेपर्यंत महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाच्या college.section@unigug.ac.in या ई-मेल आय.डी. वर तसेच हार्ड कॉपीसह तातडीने विद्यापीठात सादर करावे. सदर माहिती विहीत मुदतीत सादर न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. करीता नोंद घ्यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

( डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail :
schol.dhepune@gov.in

क्र. उशिंस -शिष्य/२०२६-२७/मराठा माहिती/संकिर्ण/E -३०६२२२२ दिनांक- /०८/२०२६.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय :- मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतची माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ :-. शासनपत्र क्र. संकीर्ण -२०२६/ प्र.क्र. ५७७/तांशि-४, दि.
दि. २२/७/२०२६.

उपरोक्त संदर्भांकित विषयी उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील विदयार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती तसेच सोयी-सुविधा सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुषंगाने **विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत सर्व महाविदयालयांची** माहिती खालील तक्त्यात भरून तात्काळ दोन दिवसांत संचालनालयाच्या school.dhepune@gov.in या ईमेल आयडीवर सादर करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्थ अनुदानित / विना अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालये आणि सर्व अकृषी विद्यापीठे यांची SEBC प्रवर्गातील अभ्यासक्रम निहाय / मुले / मुली निहाय प्रवेशित एकूण विद्यार्थी संख्या.**

**SEBC Admitted AY २०२५-२६**

विद्यापीठाचे नांव-

| Sr. No, | Program Level | Male | Female | Total | विद्यापीठाचा आर्थिक भार (रुपयात) ( शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्क) | महाविद्यालयांचा आर्थिक भार ( शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्क) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अनुदानित एकूण भार (रुपयात) | कायम विना अनुदानित एकूण भार (रुपयात) |
| १ | Diploma ( IfAny) | | | | | | |
| २ | Under Graduate(B.A./ B.Com/ B.Sc) | | | | | | |
| ३ | Post Graduate (M.A./M.Com /M.Sc) | | | | | | |
| ४ | Ph.D./Any other | | | | | | |
| | Total | | | | | | |

Digitally signed by
Hemant Ramdas Deore
Date: 20-08-2026
12:05:19

(हेमंत देवरे )
प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे — १६.

प्रत -

सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद असलेली माहिती कुलसचिव,सर्व अकृषी विद्यापीठे यांचेकडून माहिती उपलब्ध करून घेऊन संचालनालयास उपरोक्त नमूद ईमेलवर तात्काळ पाठविण्यासाठी पाठपुरावा करावा व माहिती सादर करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner